# ।। ॐ ।।

**योग विद्या गुरूकुल** **१ जानेवारी २०२१**

## उपचार केंद्र – मान्यता नियमावली

संस्थेचे कार्य --

**यो**ग विद्या गुरूकुल नाशिक या संस्थेची स्थापना वर्षप्रतिपदेच्या मुहुर्तावर १९८३ साली झालेली असून या वेळेपासून संस्था **'योग विद्यापीठ',** नाशिक या नावाने कार्यरत होती. २००१ सालापासून विद्यापीठाचे नामकरण व नोंदणी **'योग विद्या गुरूकुल',** नाशिक असे करण्यात आले. ही सेवाभावी संस्था असून धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेची नोंदणी झालेली आहे. (नोंदणी क्र. एफ ६३३५ नाशीक) योगतज्ञ डॉ. श्री. विश्वासराव मंडलीक हे संस्थेचे संस्थापक असून योग विद्या गुरूकुलचे कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.

ही योगाची दिव्य पताका जगात साऱ्या मिरवू या ।

योग शिकू अन् शिकवू या ।। योग शिकू अन् शिकवू या ।।

हे गुरुकुलचे बीद्रवाक्य असून योगशिक्षण-प्रशिक्षण, योगोपचार, योगप्रचार व योग विषयक शास्त्रीय संशोधन हे गुरूकुलचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्थेने योग विषयक विविध अभ्यासक्रम तयार केलेले असून सर्व अभ्यासक्रमांची परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केलेली आहे.

संस्थेची महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही व्याप्ती असून या सर्वांचे नियंत्रण कुलगुरू आणि कुलसचिव यांच्या केंद्रिय मंडळाद्वारे केले जाते. या मंडळाच्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात एक परीक्षा संचालक आणि प्रत्येक शाखेमध्ये एक परीक्षा प्रमुख अशी व्यवस्था केलेली आहे. सध्या एकूण १९ परिक्षा संचालक व ५० परीक्षा प्रमुख नियुक्त केलेले आहेत. या पध्दतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये १५० ठिकाणी संस्थेचे कार्य सुरू असून महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, गोवा, आसाम, मध्यप्रदेश अशा विविध राज्यांमध्येही कार्य सुरू आहे.

योग विद्या गुरूकुलद्वारा तळवाडे, त्र्यंबकेश्वर येथील विश्वयोग दर्शन या आश्रमामध्ये गुरूकुल (निवासी) पध्दतीने योगशिक्षण दिले जाते.

आतापर्यंत साधारणत: ५००० पेक्षाही जास्त विदेशी साधक या केंद्रात राहून योगशिक्षक प्रमाणपत्र घेऊन गेलेले आहेत. परदेशात १६ केंद्रामधून योग विद्या गुरूकुल चे अभ्यासक्रम शिकवले जातात.

* महाराष्ट्र शासनाचा निसर्गोपचार व योग प्रमाणपत्र वर्ग चालवण्याकरता शासनाची मान्यताही संस्थेला मिळालेली आहे.

* मुक्त विद्यापीठाचा योगशिक्षक अभ्यासक्रम चालवण्याकरताही मुक्त विद्यापीठाची मान्यता आपल्या संस्थेला मिळालेली आहे.

* योग विद्या गुरुकुलमार्फत चालवल्या जाणाऱ्या योग महा विद्यालयाला नागपूरच्या कालिदास संस्कृत विद्यापीठाने सल्लघ्नता दिलेली आहे. या ठिकाणी एम. ए. (योगशास्त्र) हे वर्ग चालवले जातात.

*** Yoga Certification Board (YCB) यांनी योग विद्या गुरुकुलला Leading Yoga Institute म्हणून मान्यता दिलेली असून YCB चे सर्व अभ्यासक्रम शिकवण्याचे व परीक्षा घेऊन निकाल लावण्याचे सर्व अधिकार यांनी योग विद्या गुरुकुलला दिलेले आहेत.**

*** महाराष्ट शासनाच्या आयुष विभागाच्या संचालकांनी योग विद्या गुरुकुलच्या अभ्यासक्रमांना मान्यता दिलेली आहे.**

महाराष्ट शासन पत्र संदर्भ क्र.आसंमुं/योगविद्यानाशीक/शासनमान्यता/२०१८/आयु-२/६८७८
( दिनांक १० एप्रिल २०१८)

<u>योग विद्या गुरुकुल - नाशिक चे अभ्यासक्रम</u>

<u>व्यक्तिगत विकासासाठी योग अभ्यासक्रम</u>

* योग प्रवेश

* योग परिचय

* योग प्रबोध

* योग प्रवीण

* योग पंडित

* योग रत्न

<u>अध्यापनासाठी योग अभ्यसाक्रम</u>

* योगशिक्षक -- पात्रता १० वी पास, वय १८
योगपरिचय अभ्यासक्रम पूर्ण.

* योगअध्यापक --
योगशिक्षक व योगप्रबोध पूर्ण केल्यानंतर
योग प्रवेश ३ वर्ग घेणे आवश्यक.

* योग प्राध्यापक --
पात्रता- कोणत्याही शाखेचे पदवीधर,
योग अध्यापक
योगपंडित पूर्ण करून, योग परिचयचे
३ वर्ग घेणे व इतर अटी बंधकारक.

योग संजीवन / योग सोपान हे वर्ग रुग्णांकरिता किंवा वृध्दांकरिता असल्याने या वर्गांची परीक्षा घेतली जात नाही. वर्ग पूर्ण केल्यानंतर उपस्थिती प्रमाणपत्र दिले जाते.

संस्थेद्वारा ३१/१२/२०२० पर्यंत योग शिक्षणाचा लाभ घेतलेल्या साधकांची आकडेवारी

| अभ्यासक्रम | | अध्यापन वर्ग | | निसर्गोपचार वर्ग | |
|---|---|---|---|---|---|
| योग प्रवेश | ६,५०,००० | योग शिक्षक | १३,५०० | निसर्गोपचार प्रमाणपत्र | १,२५० |
| योग परिचय | ३५,५०० | इंग्रजी (T.T.C) | ४५०० | पर्यायी वैद्यक | ९९० |
| योग प्रबोध | ८,०५० | योग अध्यापक | ९५० | निसर्गोपचार पदविका | ५६० |
| योग प्रवीण | १,७०० | योग प्रध्यापक | २५० | Y.C.B. Level II | 150 |
| योग पंडित | ५१५ | एम्. ए. (योगशास्त्र) | ४५० | Y.C.B. Level III | 25 |

याशिवाय मधुमेह निवारण, स्थुलता निवारण, आर्तवदोष निवारण, गर्भसंस्कार असे अनेक प्रशिक्षण वर्ग सतत आयोजित केले जातात.

योग विद्या गुरूकुल, नाशिक संस्थेची मान्यता असणाऱ्या केंद्रामध्ये वरील अभ्यसाक्रम पूर्ण केल्यानंतर गुरूकुलच्या नियमाप्रमाणे परीक्षा घेतल्या जातात व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना **आयुष मान्यता प्राप्त प्रमाणपत्र** दिले जाते.

योग केंद्रांची मागणी व गरज लक्षात घेऊन अशा केंद्रांना गुरूकुलच्या नियम व अटींची पूर्तता केल्यास गुरूकुलच्या कार्याचा लाभ घेता येईल.

## मान्यताप्राप्त केंद्रांकरिता नियमावली

* ज्या संस्था परंपरागत योगाच्या (पातंजल योग व हठयोग) प्रचारात कार्यरत आहेत त्यांना मान्यतेकरिता अर्ज करता येतील.

मान्यताप्राप्त केंद्रांनी पुढील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) सदर संस्थाकेंद्र योग विद्या गुरूकुलचे विहित अभ्यासक्रम चालवू शकतील. त्या संस्थांनी योगक्षेत्रात उपयुक्त संशोधन कार्यही करणे अपेक्षित आहे.

२) गुरूकुलची मान्यता मिळाल्यानंतर योग वर्गांच्या संदर्भात गुरूकुलच्या केंद्रिय कार्यालयाकडून आलेल्या आदेशांचे व सूचनांचे पालन करावे.

३) योगवर्ग घेत असतांना योग शिक्षक व विद्यार्थी संख्या या संदर्भात गुरूकुच्या नियमांचे पालन करावे.

४) मान्यता प्राप्त संस्थाकेंद्रांनी योग वर्ग घेण्याकरता हॉल, वाचनालय व अन्य साधने कायम उपलब्ध करावी.

५) योग विद्या गुरूकुलने मान्यता दिलेल्या शिक्षकांनीच योग शिक्षण दिले पाहिजे. मान्यता नसलेल्या शिक्षकांना वर्ग घेण्यास सांगितले जाऊ नये.

६) मान्यतेकरिता विहित नमून्याात गुरूकुलकडे अर्ज करावा. या अर्जासोबत योग विद्या गुरूकुलच्या नावाने (नोंदणी शुल्क) रु.२५,०००/- चा डी. डी. पाठवावा. नंतर दर वर्षी रु. ५,०००/- मान्यता शुल्क द्यावे लागेल. (वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे असेल.)

या अर्जाशिवाय अधिक माहिती आवश्यकता वाटल्यास मागवली जाईल, ती देणे केंद्रांकरिता आवश्यक आहे. मान्यतेचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर एका महिन्यात योग विद्या गुरूकुलचे दोन पदाधिकारी आपल्या केंद्राच्या पहाणीकरिता येतील.

७) वरील अर्ज गुरूकुलच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यावर तसे प्रमाणपत्र केंद्राला दिले जाईल. सदर मान्यता दोन वर्षाकरता असेल. सदर प्रमाणपत्र मुख्य कार्यालयात स्पष्ट दिसेल असे लावले पाहिजे.

८) केंद्राच्या कार्यालयाबाहेर व अन्य कार्यक्रमाचे ठिकाणी पुढीलप्रमाणे बोर्ड लावावा.

९) केंद्राने आपल्या कार्याचा अहवाल दरवर्षी (१ एप्रिल ते ३१ मार्च) ३१ मे पर्यंत कार्यालयात पाठवावा.

१०) कार्य अहवालात, घेतलेले वर्ग व विद्यार्थी संख्या आवर्जून लिहिणे. गुरुकुलकरता पाठवलेले शुल्क लिहून त्याचा पावती क्रमांक लिहिणे.

योग विद्या गुरूकुल नाशिक.
मान्यता प्राप्त केंद्र – संस्थेचे नाव

मान्यता नोंद क्रमांक
YVG / TC/ XXXX

११) प्रत्येक केंद्रात दर दोन वर्षातून एका वेळेस सर्व योगशिक्षकांचा १ दिवसांचा उजळणी वर्ग आयोजित करावा. याकरता गुरूकुमार्फत एक योजना पाठवली जाईल.

१२) शिक्षणक्रम व परीक्षा यांच्या संदर्भात गुरूकुलकडून मिळालेल्या सूचनांचे पालन केले जावे.

१३) दरवर्षी योग विद्या गुरूकुलचा एक पदाधिकारी आपल्या केंद्रात श्रेयांक मापनासाठी येईल. त्यावेळी आपण केलेल्या योग कार्याची माहिती त्यांना द्यावी.

१४) मान्यता प्राप्त केंद्राचे कार्य योग विद्या गुरूकुलच्या नियमांप्रमाणे चालले नसल्याचे लक्षात आल्यास सदर केंद्राला खुलासा करण्याची संधी देण्यात येईल. यानंतर कार्यकारी मंडळाला सदर केंद्राचे कार्य व्यवस्थित चालले नसल्याचे लक्षात आल्यास कार्यकारी मंडळ सदर केंद्राची मान्यता रद्द करू शकेल.

१५) मान्यता प्राप्त केंद्रालातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा योग विद्या गुरूकुलमार्फत घेतल्या जातील. परीक्षक व पर्यवेक्षक गुरूकुलमार्फतच पाठविले जातील. त्यांची या कालावधीसाठी निवास, भोजन इत्यादी व्यवस्था संबंधित योग केंद्राला करावी लागेल.

१६) केंद्रातर्फे चालवता येणारे वर्ग व त्यांचे शुल्क

**१) योग संजीवन / योग सोपान --** प्रति विद्यार्थी रु.५०/- किंवा प्रती वर्ग - रु. १०००/- नोंदणी शुल्क

वर्गासाठी लागणारे कार्यकर्ते --१ वर्ग शिक्षक, १ सहशिक्षक.

**२) योग प्रवेश वर्ग --** प्रति विद्यार्थी रु.४००/- परीक्षा शुल्क + रु.१०००/- प्रती वर्ग, भवननिर्माण निधि.

वर्गासाठी लागणारे कार्यकर्ते --१ वर्ग शिक्षक, १ सहशिक्षक, ५ व्याख्याते, ४ परिक्षक.

**३) योग परिचय वर्ग** --प्रति विद्यार्थी रु.६००/- परीक्षा शुल्क + रु.२०००/- प्रती वर्ग, भवननिर्माण निधि.

वर्गासाठी लागणारे कार्यकर्ते -- १ वर्ग शिक्षक, १ सहशिक्षक, १४ व्याख्याते, ६ परीक्षक व लेखी परीक्षांसाठी २ पर्यवेक्षक.

**४) योग प्रबोध वर्ग --** प्रति विद्यार्थी रु. ८००/- परीक्षाशुल्क + रु.३०००/- प्रती वर्ग, भवननिर्माण निधि.

वर्गासाठी लागणारे कार्यकर्ते --१ वर्गशिक्षक, १ सहशिक्षक, ४ व्याख्याते (१६ व्याख्याने), ५ परीक्षक, ४ लेखी परीक्षांसाठी ४ पर्यवेक्षक.

हा वर्ग रोज दीड तास याप्रमाणे ३ महिने चालतो.

**५) योग शिक्षक वर्ग --** प्रति विद्यार्थी रु.१,०००/- परीक्षा शुल्क + रु.५०००/- प्रती वर्ग, भवन निर्माण निधि.

विद्यार्थी पात्रता-- १२ वी उत्तीर्ण व योग परिचय वर्ग उत्तीर्ण. हा वर्ग अनिवासी आहे.

अनिवासी वर्गासाठी कार्यकर्ते-- १ प्रशिक्षक, १२ व्याख्याते, ३/४ पाठ निरीक्षक.

**या विद्यार्थ्यांना ८ दिवस गुरुकुल येथे निवासी सत्राकरिता याचे लागेल, त्याचे शुल्क रु. ५,०००/- आहे. हे निवासी सत्र पूर्ण केल्यावरच शिक्षकचे प्रमाणपत्र दिले जाईल.**

**६) निसर्गोपचार प्रमाणपत्र वर्ग -** प्रति विद्यार्थी रु.१,०००/- परीक्षा शुल्क + रु.५०००/- प्रती वर्ग, भवन निर्माण निधि. **या विद्यार्थ्यांना १० दिवस गुरुकुलच्या उपचार केंद्रात रुग्णोपचार निवासी सत्राकरिता पूर्व नोंदणी करून यावे लागेल, त्याचे शुल्क रु. ५,०००/- आहे. हे निवासी सत्र पूर्ण केल्यावरच निसर्गोपचाराचे प्रमाणपत्र दिले जाईल.**

विद्यार्थी पात्रता-- १२ वी उत्तीर्ण

वर्गासाठी कार्यकर्ते -- १ योगशिक्षक, २ निसर्गोपचार प्रमाणपत्र प्राप्त कार्यकर्ते व

२ निसर्गोपचार पदविका प्राप्त कार्यकर्ते

**७) निसर्गोपचार पदविका वर्ग -** प्रति विद्यार्थी रु.१,५००/- परीक्षा शुल्क + रु.७,५००/- प्रती वर्ग, भवन निर्माण निधि. **या विद्यार्थ्यांना १० दिवस गुरुकुलच्या उपचार केंद्रात रुग्णोपचार निवासी सत्राकरिता पूर्व नोंदणी करून यावे लागेल, त्याचे शुल्क रु. ५,०००/- आहे. हे निवासी सत्र पूर्ण केल्यावरच निसर्गोपचाराचे पदविका प्रमाणपत्र दिले जाईल.**

विद्यार्थी पात्रता-- निसर्गोपचार प्रमाणपत्र उत्तीर्ण

वर्गासाठी कार्यकर्ते -- १ योगशिक्षक, १ निसर्गोपचार प्रमाणपत्र प्राप्त कार्यकर्ते व

४ निसर्गोपचार पदविका प्राप्त कार्यकर्ते

१७) वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी गुरूकुलची पाठ्यपुस्तके उपलब्ध आहेत. सर्व केंद्रांना या पुस्तकांच्या रोख खरेदीवर २०% सूट आणि शुध्दिक्रिया साहित्याच्या खरेदीवर १० % सूट दिली जाईल.

तसेच या सर्व परीक्षांसाठी गुरूकुलचा असलेला अभ्यसाक्रम आणि परीक्षा पध्दती याबाबत असलेले माहितीपत्रक शुल्क भरून आपणांस मिळेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योग प्रवेश | रु.२५/- | योग परिचय | रु.३०/- | योग शिक्षक | रु.५०/- |
| योग प्रबोध | रु.५०/- | योग अध्यापक | रु.१००/- | योग प्रवीण | रु.१००/- |

१८) वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी गुणपत्रके, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, परीक्षा अर्ज, आवेदनपत्र तसेच प्रमाणपत्र वगैरे सर्व परीक्षा साहित्य गुरूकुलमार्फत पुरविले जाईल. परीक्षांचा खर्च गुरुकुलच्या वतीने केला जाईल.

१९) सदर केंद्राच्या मार्फत चालवल्या जाणाऱ्या वर्गाचे शुल्क ठरवण्याचे सर्व अधिकार त्या केंद्रालाच असतील.

२०) सदर केंद्राच्या अंतर्गत कार्यात गुरुकुल हस्तक्षेप करणार नाही पण त्याचबरोबर सदर केंद्राच्या कोणत्याही कृतीची जबाबदारी गुरुकुलवर रहाणार नाही.

२१) वरील नियमावलीत बदल करण्याचे अधिकार गुरुकुलच्या कार्यकारी मंडळाला आहेत.

## उपचार केंद्राकरिता नियमावली

१) सदर केंद्र बाह्यरुग्णांकरिताच चालवले जावे.
२) रुग्ण तपासणी गुरुकुलच्या डॉक्टरांनी केली तर प्रति रुग्ण रु. ३००/- शुल्क गुरुकुलला द्यावे लागेल.
३) केंद्रामध्ये एक डॉक्टर (वैद्यकीय पदवीधर) नियुक्त केलेला असावा.
४) रुग्णावर उपचार करण्याची व त्याच्या परिणामाची संपूर्ण जबाबदारी केंद्राची असेल च योग विद्या गुरुकुल त्याकरिता व त्याअनुषंगाने कायदेशीर परिणामांकरिता जबाबदार असणार नाही.
५) रुग्ण मिळवणे, त्याकरिता जाहिरात करणे व त्यावर उपचार करणे ही सर्व जबाबदारी केंद्राची असेल.
६) केंद्राकरिता लागणारे सीहित्य, जागा व कार्यकर्ते यांची यादी सोबत दिली आहे, त्यानुसार सर्व व्यवस्था केंद्राने करावी. त्याची नियमित पहाणी गुरुकुलमार्फत केली जाईल. आवश्यता असल्यास कार्यकर्ते व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्थाही गुरुकुलमार्फत काली जाईल.
७) रुग्णउपचार व्यवस्थेचीही नियमित पहाणी गुरुकुलमार्फत केली जाईल. त्याकरिता रुग्णउपचाराची सर्व नोंद व्यवस्थित ठेवावी.

## Requirements for therapy center

**Reception section (**Area 10*10 Feet = 100 Sq. Feet)

- Office Table - 1
- Chairs - 4
- Steel cupboard - 2
- Stationary
- First aid Box.

**Treatment Section**

**Area:**

Massage Room Area 8*10 Feet – 2 nos……160 Sq. Feet
Steam Bath Room Area 6*6Feet – 2 Nos……72 Sq. Feet
Bath Room Area 6*6Feet – 2 Nos………………72 Sq. Feet
Rest Room Area 10*10 Feet……………………100 Sq. Feet

**Equipment:**

- Massage Tables 6*4*2.5 Feet - 2 nos
- Infrared lamps - 2 nos
- Basti Instruments
- Acupressure Instruments

- Sphygmomanometer
- Stethoscope
- Weighing machine
- Steam Bath Box 4*4*4  - 2 nos
- Gas Cylinder, Shegadi, Lighter
- Sesame Oil
- Napkins & Towels
- Drinking Water
- Chair or Stool 2

**Bath Room**

- Water Heater 1
- Buckets
- Mugs
- Chair or Stool

**Rest Room**

- Cot with bed & blanket (For Shavasan)

**Yoga Hall** **(Area 20*20 Feet** = 400 Sq. Feet)

- Yoga Mats
- Yoga Photos (Swamiji, Om, etc.)
- Sound System (CD Player, Speaker)
- Pillow 6
- Chair 6
- Cot with bed & Traction Set (Lumber & Cervical) 2

# Staff requirement for therapy center

1) 1 Expert Yoga Therapist cum Yoga Teacher (Must have completed Yoga Pradhyapak or Yoga & naturopathy therapy course from any recognized institute.)
2) 2 Therapist (1 male & 1 Female) Must have completed Naturopathy course from any Recognized Institute.
3) 1 Receptionist.

   1 Sweeper cum attendant.

योग विद्या गुरुकूल करिता

श्री. शरद पारगावकर

कार्यवाह